# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in
ar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments & Quality Assurance ( AAQA )
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32


NAAC Accredited with A++

क्र. एएक्युए/आयसीडी/२०२१–२२/३८१ दि. ०४ जानेवारी, २०२२

विषय :– उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यायातील विविध पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याबाबत...

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाचे विविध विभागांचे विभागप्रमुख, संस्थाचे संचालक, प्रभारी संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय), प्राचार्य, सर ज.जी. स्थापत्यशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, आदर्श महाविद्यालय, तळेरे/अंबावडे, प्रभारी संचालक/समन्वयक रत्नागिरी, कल्याण आणि ठाणे उपपरिसर, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी क्र. संकीर्ण–२०२१/(७५/२१)/(१)/मशि–३, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी सैध्दांतिक, प्रात्याक्षिके इत्यादी कामांकरीता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाचे दर सुधारीत करण्यात आलेले आहे. (प्रत संलग्न)

सदर शासन निर्णय मुंबई विद्यापीठाचे विविध विभाग/संस्था/केंद्र/आर्दश महाविद्यालये तसेच उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेल्या अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना लागू करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या बाब क्र. १४ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी सैध्दांतिक, प्रात्याक्षिके इत्यादी कामांकरीता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाचे दर सुधारीत लागू करण्याच्या ठरावास मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी सर्व संबंधीतांनी क्र. संकीर्ण–२०२१/(७५/२१)/(१)/मशि–३, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूदींची अंमलबजावणी करुन पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी सैध्दांतिक, प्रात्याक्षिके इत्यादी कामांकरीता अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाचे सुधारीत दर नमूद अटींच्या अधिन राहून लागू करण्यात येत आहे.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखाली असलेल्या संबंधित अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांच्या निदर्शनास आणावे.

(सुधीर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई – ४०० ०३२.
दि. ०४ जानेवारी, २०२२

P.T.O.

University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in
ar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments &
Quality Assurance ( AAQA )
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

NAAC Accredited with A++



प्रति,

मुंबई विद्यापीठाचे विविध विभागांचे विभागप्रमुख, संस्थाचे संचालक, प्रभारी संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय), प्राचार्य, सर ज.जी. स्थापत्यशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, आदर्श महाविद्यालय, तळेरे/अंबावडे, प्रभारी संचालक/समन्वयक रत्नागिरी, कल्याण आणि ठाणे उपपरिसर, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

अ) प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना :–

१. विविध शाखांचे अधिष्ठाता,
२. मा. वित्त व लेखा अधिकारी
३. प्रभारी संचालक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (युसीसी), मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
४. उपकुलसचिव, विद्याविषयक प्राधिकरणे, बैठका व सेवा विभाग (AAMS), मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
५. स्वीय सहायक : १) कुलगुरु २) प्र–कुलगुरु ३) कुलसचिव

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/ संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/ तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२१/(७५/२१)/(१)/मशि-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२१.

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- टीईडी-२००८/(१८३)/०८/तांशि-५, दिनांक ०५ नोव्हेंबर,२००८.

२) शासन निर्णय,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- संकीर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८.

**प्रस्तावना** :

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सैध्दांतिक, प्रात्याक्षिके इत्यादी कामांकरीता संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये लागू करण्यात आलेले मानधनाचे दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वांगीन विचार करुन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय** :

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार | सुधारित दर (प्रति तासाकरीता) | |
|---|---|---|---|
| | | सैद्वांतिक | प्रात्याक्षिके |
| १ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी) | रु.६२५/- | रु.२५०/- |
| २ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदव्युत्तर) | रु.७५०/- | रु.३००/- |
| ३ | शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु.७५०/- | रु.३००/- |
| ४ | विधी (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु.७५०/- | रु.३००/- |

२. सदरहू सुधारित दर दिनांक ०१ ऑक्टोंबर, २०२१ पासून अनुज्ञेय होतील.

३. वरील सुधारीत दर पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१) शासकीय महाविद्यालये/संस्था यामधील अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांसाठी संदर्भाधिन क्र.१) येथील शासन निर्णय, दिनांक ०३/११/२००८ मधील नमूद अटी कायम राहतील.

२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना संदर्भाधिन क्र.२) येथील शासन निर्णय, दिनांक १४/११/२०१८ मधील परि.क्र.२ मध्ये नमूद अटी कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.८२०/२०२१/व्यय-५, दिनांक ०८/०९/२०२१ नुसार प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र. २०२११०२२१८३२५२७८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Hemantkumar Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra
Date: 2021.10.22 18:26:09 +05'30'

(हे.पं.बाविस्कर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी.
८. निवड नस्ती, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.